

पू. साने गुरुजी यांच्या जयंती निमित्त आणि डॉ. व्दारकादास लोहिया(बाबुजी) यांच्या स्मरणार्थ

# मराठवाडा नवनिर्माण लोकायत (मानवलोक) व मानवलोक समाजकार्य महाविद्यालय

अंबाजोगाई, जि. बीड

मानवलोक
एक प्रयोग ग्रामीण पुनर्रचनेचा

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# डॉ. व्दारकादास लोहिया (बाबुजी)
# लोकसहभाग पुरस्कार वितरण व राष्ट्रीय जल परिषद



दिनांक 24 डिसेंबर 2024

## उद्धघाटन सत्र — सकाळी 9.45 ते 10.45 वा.

उद्धघाटक
**मा.आ. नमिताताई अक्षय मुंदडा**
आमदार, केज विधानसभा

प्रमुख अतिथी
**मा.श्री. दत्ता देशकर**
संपादक, मासिक जलसंवाद,पुणे

अध्यक्ष
**मा.श्री. अशोकराव देशमुख**
अध्यक्ष, मानवलोक, अंबाजोगाई

## लोकसहभाग पुरस्कार — दुपारी 03.45 वा.

सत्कार मुर्ती
**मा. कृषीभूषण तथा जलतज्ञ**
**श्री. विजय (अण्णा) बोराडे**
सचिव, मराठवाडा शेती सहाय्यक मंडळ, जालना

हस्ते
**मा.श्री. संजय सिंग**
अध्यक्ष, परमार्थ संस्था, बुंदेलखंड,
झांशी, उत्तरप्रदेश

प्रमुख अतिथी
**मा.डॉ.राजेंद्रसिंह भाईजी**
जलपुरुष, राजस्थान

अध्यक्ष
**मा.डॉ. मलिन्नाथ कलशेट्टी**
भा. प्र. से. (से.नि.)
संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे

स्थळ - ॲड.भगवानदासजी लोहिया कल्याण मंडप्म मानवलोक, रिंग रोड, अंबाजोगाई

## चर्चासत्र

### उद्घाटन सत्र

सकाळी 9.45 ते 10.45 वा.

**उद्घाटक**

मा.आ. नमिताताई अक्षय मुंदडा

आमदार, केज विधानसभा

**प्रमुख अतिथी**

मा.श्री. दत्ता देशकर

संपादक, मासिक जलसंवाद,पुणे

**अध्यक्ष**

मा.श्री. अशोकराव देशमुख

अध्यक्ष, मानवलोक, अंबाजोगाई

**पहिले सत्र :** सकाळी 10.45 ते 11.45 वा.

### विषय : मराठवाड्यातील नदी खोरे व भू - रचना

**अध्यक्ष**

मा. डॉ. सुमंत पांडे

भुतपुर्व कार्यकारी संचालक, जलसाक्षरता केंद्र, यशदा, पुणे

**प्रमुख मार्गदर्शक**

मा.डॉ. श्रीनिवास वडगबाळकर

प्राचार्य, (से.नि.) दयानंद महाविद्यालय, सोलापूर

मा.श्री. रोहन पवार

वरिष्ट भू- वैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, बीड

**सत्र दुसरे :** सकाळी 11.45 ते दुपारी 1.00 वा.

### विषय : जलव्यवस्थापन व महिलांचा सहभाग

**अध्यक्ष**

मा. संजय सिंग व जलसहेली टीम

(अध्यक्ष, परमार्थ संस्था, बुंदेलखंड, झांशी, उत्तरप्रदेश)

**प्रमुख मार्गदर्शक**

मा. मेधा जोशी

(सल्लागार तथा अभ्यागत प्राध्यापक,यशदा, पुणे)

मा. आश्विनी कुलकर्णी

(प्रगती अभियान, नाशिक)

वेब: www.manavlokcollegeofsocialwork.co.in

Email : - admin@manavlok.org
manavlok1999@gmail.com

**सत्र तिसरे :** दुपारी 2.00 ते 3.00 वा.

### विषय : - जलव्यवस्थापनातील लोकसहभाग आणि सिंचन व्यवस्था

**अध्यक्ष**

मा.डॉ.अजित गोखले

शास्त्रज्ञ तथा संस्थापक, नॅचरल सोल्युशन, पुणे

**प्रमुख मार्गदर्शक**

मा.डॉ. प्रदिप भलगे

प्रोफेसर, सिव्हील इंजिनिअरींग डिपार्टमेंट, हायटेक इन्स्टीट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, वाळुज, छ.संभाजीनगर

मा.श्री.शरद घुगे

संस्थापक, जयमल्हार सिंचन सहकारी संस्था, इंदोरे ता.दिंडोरी जि.नाशिक

**सत्र चौथे :** दुपारी 3.00 ते 3.45 वा.

### विषय : शाश्वत विकास : जलसमृध्द गाव

**अध्यक्ष**

मा.डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी
भा. प्र. से. (से.नि.)

संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे

**प्रमुख मार्गदर्शक**

डॉ.आनंद पुसावळे

(कार्यकारी संचालक, जलसाक्षरता केंद्र, यशदा, पुणे)

दुपारी 03.45 वा.

### डॉ. व्दारकादास लोहिया (बाबुजी) लोकसहभाग पुरस्कार वितरण

**हस्ते**

मा.श्री. संजय सिंग

अध्यक्ष, परमार्थ संस्था, बुंदेलखंड, झांशी, उत्तरप्रदेश

**सत्कार मुर्ती**

मा. कृषीभूषण तथा जलतज्ञ

श्री. विजय (अण्णा) बोराडे

विश्वस्थ, मराठवाडा शेती सहाय्यक मंडळ, जालना

**अध्यक्ष**

मा.डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी
भा. प्र. से. (से.नि.)

संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे

**प्रमुख अतिथी**

मा.डॉ.राजेंद्र सिंह (भाईजी)

जलपुरुष, राजस्थान

(रीटा रॅाड्रीग्युस लिखीत चंबळ खोऱ्यातील जलक्रांती,पुस्तक प्रकाशन)

- पत्ता -

**मानवलोक समाजकार्य महाविद्यालय**

रिंग रोड, अंबाजोगाई, जि. बीड (महाराष्ट्र) 431517



मानवलोक
एक प्रयोग ग्रामीण पुनर्रचनेचा





**पू. साने गुरुजी यांच्या जयंती निमित्त**

आणि

**डॉ. व्दारकादास लोहिया (बाबुजी) यांच्या स्मरणार्थ**

**मराठवाडा नवनिर्माण लोकायत (मानवलोक)**

व

**मानवलोक समाजकार्य महाविद्यालय**

अंबाजोगाई, जि. बीड

यांच्या संयुक्त विद्यमाने

आयोजित

# डॉ. व्दारकादास लोहिया (बाबुजी) लोकसहभाग पुरस्कार वितरण व राष्ट्रीय जल परिषद

**दिनांक 24 डिसेंबर 2024**

**विनित**

**श्री. लालासाहेब आगळे**
सहकार्यवाह
मानवलोक, अंबाजोगाई

**श्री. अनिकेत लोहिया**
कार्यवाह
मानवलोक, अंबाजोगाई

**डॉ. हनुमंत साळुंके**
समन्वयक, राष्ट्रीय जलपरिषद
मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई

**डॉ. प्रकाश जाधव**
प्राचार्य
मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई

स्थळ - ॲड.भगवानदासजी लोहिया कल्याण मंडप्म मानवलोक रिंग रोड, अंबाजोगाई

## मराठवाडा नवनिर्माण लोकायत (मानवलोक)

मराठवाडा नवनिर्माण लोकायत (मानवलोक) या स्वयंसेवी संस्थेची स्थापना 1982 मध्ये डॉ. द्वारकादास लोहिया (बाबुजी)आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केली. महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागातील तीन जिल्हयाच्या सात तालुक्यातील 300 हून अधिक गावामध्ये अल्पभूधारक शेतकरी, भूमिहीन, महिला, मजूर, बालके, वृध्द यांच्या सामाजिक, आर्थिक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी विविध उपक्रमाद्वारे सुरू झालेले कार्य सद्यस्थितीत महाराष्ट्रातील 10 जिल्हयामधून शेती, पाणी, पर्यावरण, शाश्वत विकास, सक्षमीकरणाचे प्रयोग अविरतपणे सुरू आहेत. ग्रामीण पुनर्रचनेसाठी आवश्यक असणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी संस्था सातत्याने ध्येयवादी भूमिकेतून प्रयत्न करीत आहे.

> **"लोकांकडे जा, लोकांमध्ये रहा,**
> **त्यांच्याकडून शिका, त्यांच्यावर प्रेम करा,**
> **त्यांना जे माहित आहे त्यासह प्रारंभ करा**
> **आणि त्यांच्याकडे जे आहे त्यातून निर्मिती करा "**

या ब्रीदवाक्यातून मानवलोकचे कार्य प्रतिबिंबित होते. लोकांच्या सहभागातून नवनिर्मिती हे मानवलोकच्या ग्रामीण विकासातील नवकल्पनेचे प्रयोगाचे प्रतिक आहे. या सर्व कामात ग्रामस्थ स्वतः पुढाकार घेतात, नियोजन करतात, निर्णयाद्वारे कृती आणि नियंत्रणाचे केन्द्रबिंदु असतात. लोकसहभाग, पारदर्शकता आणि सर्वंकष दूरदृष्टी ही संस्थेची प्रमुख वैशिष्टये आहेत.

## मानवलोक समाजकार्य महाविद्यालया विषयी

मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाची स्थापना डॉ. द्वारकादास लोहिया (बाबुजी) यांच्या ग्रामीण विकासासाठी प्रशिक्षित, दर्जेदार आणि संवेदनशील कार्यकर्ते निर्माण व्हावेत या विचारधारेतून करण्यात आली आहे. मराठवाडा नवनिर्माण लोकायतच्या (मानवलोक) विधायक उपक्रमांची पुढील दिशा म्हणून महाविद्यालयाकडे बघितले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरशी संलग्नित समाजकार्यातील पदव्यूत्तर पदवीचे (एम.एस.डब्ल्यू.) शिक्षण देणारे हे महाविद्यालय 1999 मध्ये सुरू करण्यात आले. आजपर्यंत 1050 पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी समाजकार्याची पदव्यूत्तर पदवी मिळवून समाजकल्याण, आरोग्य, शिक्षण, ग्रामीण-शहरी विकास, स्वयंसेवी संस्था अशा विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीतील प्रथम पाच क्रमांकात महाविद्यालयाचे विद्यार्थी दरवर्षी असतात हा महाविद्यालयाचा गौरव आहे. साडे आठ एकरच्या निसर्गरम्य परिसरात असलेल्या महाविद्यालयात अभ्यासक्रमासोबतच विविध कार्यशाळा, चर्चासत्रे, परिषदा, शिबीरे इत्यादीच्या माध्यमातून व्यावसायिक समाजकार्याचे दर्जेदार शिक्षण दिले जाते.

## डॉ. द्वारकादास लोहिया (बाबुजी) लोकसहभाग पुरस्कार विषयी

राष्ट्रसेवादल आणि समाजवादी विचाराने प्रेरीत असलेले डॉ.द्वारकादास लोहिया (बाबुजी) यांनी वैद्यकिय शिक्षण पूर्ण केल्यानंतर मराठवाडयासारख्या दुष्काळी व अवर्षणग्रस्त मातृभूमीत वास्तव्य करणाऱ्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या मागास व वंचित समुहाच्या उध्दारासाठी 1982 पासून संस्थेच्या माध्यमातून संघटित, रचनात्मक कार्यास सुरूवात केली. तत्पुर्वी विविध राजकीय, सामाजिक चळवळीशी त्यांचा जवळचा संबंध होता. 1972 च्या दुष्काळात शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलजबावणी करण्यासाठी मोर्चे, आंदोलने, घेराव यासारखे उपक्रम अंबाजोगाईच्या परिसरात त्यांनी केले. 1975 च्या आणीबाणीत त्यांना शासनाने बंदिस्तही केले होते. या काळात राजकारणाद्वारे रचनात्मक कार्याचा पाया भक्कम होवू शकत नाही याची जाणीव झाल्यानंतर त्यांनी समविचारी मित्रांना सोबत घेवून मानवलोकची निर्मिती केली. बीड जिल्हयातील उसतोड मजुरांचे स्थलांतर थांबविण्यासाठी शेतीचा विकास, पाण्याची उपलब्धी, रोजगार निर्मिती आणि जनसक्षमीकरणासाठी आरोग्य, शिक्षण, नेतृत्व विकास ही सुत्रे समोर ठेवून कार्यास सुरूवात केली. कृषक पंचायत, भूमिकन्या मंडळे, युवक मंडळाची स्थापना करून त्याद्वारे अल्पभूधारक शेतकरी, भूमिहिन शेतमजुर, महिला यांना सामुदायिक विहिरी, समन्यायी पाणी वाटप, पाणलोट क्षेत्र विकास, प्रक्रिया उद्योग, कौशल्य प्रशिक्षण इत्यादी मार्फत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. 1993 च्या किल्लारी भुकंपग्रस्तांचे पूनर्वसन, मराठवाडयातील स्वयंसेवी संस्थांची संघटनात्मक बांधणी, पारधी वस्त्यांचे सुंदर वस्तीत रूपांतर, उसतोड कामगारांचे पूनर्वसन या सारख्या उपक्रमात लोकसहभाग हा केंद्रस्थानी ठेवून अंमलबजावणी केली. लोकसहभागातून रचनात्मक आणि विधायक कार्याची प्रचिती मानवलोकच्या सध्याच्या प्रगतीकडे पाहून निश्चितच होते. या सर्वांमागे दृष्टी होती ती डॉ.द्वारकादास लोहिया (बाबुजी) यांची. दि. 23 नोव्हेंबर हा त्यांचा स्मृतीदिन...

लोकसहभागातून संघटनात्मक, रचनात्मक आणि पुनर्वसनात्मक कार्य करणाऱ्या अनेक संस्था / व्यक्ती स्थानिक ते राष्ट्रीय पातळीवर कार्यरत आहेत. अशांचा सन्मान करणे, त्यांच्या कार्याचा प्रसार करणे आणि डॉ. द्वारकादास लोहिया (बाबुजी) यांच्या स्मृती अखंड तेवत ठेवणे हे कर्तव्य माणून संस्थेने डॉ. द्वारकादासजी लोहिया (बाबुजी) लोकसहभाग पुरस्कार जाहीर केला आहे.

## राष्ट्रीय जल परिषदेविषयी

मराठवाडा हा मागास, कमी पर्जन्यवृष्टी असलेला, अवर्षण ग्रस्त, बालाघाटच्या डोंगरीरांगांनी व्यापलेला प्रदेश. चार-सहा वर्षांनी मराठवाड्याच्या कोणत्या ना कोणत्या भागात दुष्काळ हा ठरलेलाच. कोणे एके काळी व्यापार उदीम समृद्ध असलेला, संत परंपरेचा वारसा चालविणारा हा प्रदेश सर्वच दृष्टीने त्यांचाही ऱ्हास कसा झाला हा खरे तर संशोधनाचा भाग. मराठवाड्याच्या छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड, परभणीचा भाग सोडला तर उर्वरित धाराशिव, बीड, लातूर, हिंगोली या जिल्ह्यामध्ये दुष्काळ, नापिकी, टंचाई आणि स्थलांतर याचे प्रमाण सर्वाधिक निदर्शनास येते. या परिस्थितीवर मात करण्यासाठी अनेक स्वयंसेवी संघटना आणि शासन स्तरावर जल आणि मृद संधारणाचे कार्य मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आलेले आहे.

पाणी हा मानवाच्या विकासाचा केंद्रबिंदू माणून डॉ. द्वारकादास लोहिया (बाबूजी) यांनी गेली चार दशके मानवलोकच्या माध्यमातून पाण्याचा थेंब न थेंब मातीत जिरवून शाश्वत ग्रामीण विकासाचे कार्य अविरतपणे केले. अशाच प्रकारचे कार्य मराठवाड्याच्या इतर जिल्ह्यांमधून स्वयंसेवी संस्था मार्फत करण्यात येत आहेत. या सर्व कार्याचा परिपाक म्हणून काही अंशी मराठवाड्याच्या मागासलेपणाची ओळख धुसर होत असली तरी दीर्घकाळ पाणी, भूमी, पर्यावरण, कृषि, रोजगार यासारख्या घटकावर कार्य करण्याची गरज आहे. सहभाग, समन्वय आणि अनुभव समृद्ध विचारमंथनातून निश्चितच सकारात्मक बदल घडविता येतात ही भूमिका लक्षात घेऊन राष्ट्रीय स्तरावर एक दिवशीय जलपरिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

## मुख्य विषय

**मराठवाडयातील दुष्काळमुक्तीसाठी लोकसहभाग**

## उपविषय

1. दुष्काळमुक्तीसाठी स्वयंसेवी संस्थांचे योगदान
2. समन्यायी पाणी वाटप संकल्पना
3. मराठवाडयातील नदी खोरेची स्थिती आणि दुष्काळ
4. मराठवाडयातील भूरचना आणि सिंचन
5. ग्रामविकासातील जलसंधारण आणि महिलांचा सहभाग
6. जलव्यवस्थापनातील लोकसहभाग आणि सिंचन व्यवस्था
7. नवीन शैक्षणिक धोरण आणि दुष्काळमुक्ती
8. जलप्रदुषणावरील नैसर्गिक उपाय
9. दुष्काळ, शेती, सिंचन व लोकसहभाग

**नोट :** कार्यशाळेत सहभागी तज्ञ, विचारवंत, अभ्यासक, विद्यार्थी यांना विनंती की त्यांनी आपले संशोधनपर लेख, केस स्टडीज दि. १८ डिसेंबर २०२४ पर्यंत manavlok1999@gmail.com या ईमेलवर पाठवावे. सर्व संशोधनपर लेख ISSN 2349 - 3984 मानवलोक रिसर्च बुलेटीन मध्ये प्रकाशित केले जातील.
शोधनिबंधासाठी इंग्रजी मध्ये MS-Word, Times New Roman - Font Size - 12
व मराठी व हिंदी मध्ये Unicode & Kruti Dev 050 - Font Size - 16
संशोधन लेख शब्दमर्यादा 1500 ते 2500 असावी.

## संयोजन समिती


**डॉ. प्रकाश जाधव**
प्राचार्य
मो. 7770015050

**डॉ. नजीर शेख**
समन्वयक, IQAC
मो. 9421281850

**डॉ. अरुंधती पाटील**
मो. 7770015000

**डॉ. रमा पांडे**
मो. 9405343510

**प्रा. सुकेशिनी जोगदंड**
मो. 9405826977

**डॉ. किसन शिनगारे**
मो. 8080079053

**डॉ हनुमंत साळुंके**
समन्वयक, राष्ट्रीय जलपरिषद
मो. 9423962025